महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

विषय :- माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड क्रमांक नोंदणीबाबत

---

या प्रकटनाद्वारे राज्यातील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये तसेच सर्व विद्यार्थी व पालक यांना कळविण्यात येते की, शासन आदेश क्र. परीक्षा-२०१६/प्र.क्र.१७७/एसडी-२ दि.२१ सप्टेंबर, २०१६ नुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करताना सदर विद्यार्थ्याने आधार कार्ड क्रमांक सादर करणे अनिवार्य आहे.

त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०१७ पासून माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे भरताना प्रत्येक विद्यार्थ्याने त्याचा आधार कार्ड क्रमांक आवेदनपत्रात भरणे अनिवार्य आहे. तरी सर्व विद्यार्थी/पालक/ सर्व शाळांचे मुख्याध्यापक/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

दिनांक २३/९/२०१६

---

क्रमांक-पु.वि.मं./माध्य.क/१२२२
पुणे ४११ ००५.
दि.२६.०९.२०१६

प्रति,

मुख्याध्यापक, / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा, / म. विद्यालये
जिल्हा-पुणे/अहमदनगर/सोलापूर.

उपरोक्त प्रकटनाची नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

D:\Pragatan\Pragatan 2016.Docx- 30 -

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.